

# स्त्रीस्वातंत्र्य–काही स्फुट विचार

मानवी समाजाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्याची विभागणी स्त्री व पुरुष अशा दोन भिन्न घटकात झालेली आढळून येते. तेथे संख्येने हे प्रमाण निम्मे असले तरी प्रत्यक्षात हक्क व अधिकार या दृष्टीने मात्र पुरुषी वर्चस्व आढळून येते. पुरुषवर्गाने न्यायाचे माप शतकानुशतके आपल्याच बाजूला झुकते ठेवले आहे. स्त्रीबद्दल कमालीची उदासीनता व अवहेलना दाखविली गेली. पण दुसऱ्या बाजूला पुरुषाने आपल्या अनेक गरजा भागविण्यासाठी, उदा० प्रभुत्वाची गरज, तिचा वापर केलेला आढळून येतो. जे त्या समाजातील पुरुषवर्गाने जिंकलेल्या समाजातील स्त्री-वर्गावर केलेले अत्याचार हे एकच उदाहरण पुरेसे आहे. इतिहासकालीन नोंदीपासून व्हिएतनामच्या लढाईपर्यंत असेच आढळून येते. पुरुषवर्गाला केवळ प्रदेश जिंकून समाधानी होता आलेले नाही.

समाजात स्त्री व पुरुष जन्मापासून एकत्र वाढत असतात असे असूनही स्त्रीबद्दल पुरुषवर्गाचे नकारात्मक धोरण दिसून येते. तिच्या बरोबरीच्या स्थानाची जाणीवसुद्धा तिला न करू देता स्वश्रेष्ठत्व जपलेले दिसते. मानवेतर प्राण्यापेक्षा मानव संस्कृती समृद्ध असूनही त्यातील या दोन घटकांतील हे अंतर दुर्लक्ष करण्याजोगे निश्चितच मानता येणार नाही.

एकाच घरातील समान वातावरणात वाढत असतानाही मुलगा व मुलगी या त्यांच्या स्थानात फार फरक आढळून येतो. मुलगी कुटुंबावर एक प्रकारचा बोझ बनून रहाते, कारण ती आर्थिक कमाई करत नाही. तिचा खरा आसरा पित्याचे घर नसून पतीचे घर हाच आहे असे तिला सांगण्यात येते. कुटुंबात मुलगी असणे म्हणजे तिच्या स्वरुपात धन-संपत्ती हुंड्याच्या रूपाने घराबाहेर जाणे होय. ती शीलवान आहे म्हणून तिचे शील भंगण्याची शक्यता आहे. ती प्रजोत्पादन क्षम आहे, म्हणूनच तिला भ्रष्ट करता येते. अशीच स्त्रीची प्रतिमा तयार केली. तशा प्रतिमेचा स्वीकार करण्याशिवाय गत्यंतर नाही, अशी स्त्रीची असहाय्य स्थिती होते. तिची मानसिक जडण-घडणच तशी होते.

हे सर्व पहात असताना मनात कुठेतरी खटकते. मुलगी म्हणून पित्याच्या घरी तात्पुरते जीवन जगत असताना पतीच्या घरची स्वप्ने पहात जगणे आणि पतीच्या घरी गेल्यावर पती म्हणजे जन्माचा आसरा देणारा आपला स्वामी असे समजून स्वतःकडे कमीपणा घेऊन राहाणे हेच तिचे आयुष्य बनते. संसार करणे म्हणजे स्वर्गसुख मानले जाते. पण पती घरची नाती ही रक्ताची नसतात. तर बऱ्याच देवी-घेवी करून (अर्थात–शारीरिक–मानसिक–आर्थिक) निर्माण केली जातात व नंतर ही नाती पक्की करत असताना त्याग-

आत्मबलिदान याची पखरण करणे आवश्यक होते. येथे कोठेही न्यायाचा तराजू समान आढळत नाही. स्त्रीकडूनच साऱ्याची अपेक्षा केली जाते. हे सर्व घडत असताना स्त्रीला हळूहळू कळून चुकते की पती हा सुद्धा हाडामासाचा सामान्य माणूसच आहे. तेव्हा पती म्हणजेच परमेश्वर असे मानावयास शिकलेल्या स्त्रीच्या मनाला जबर धक्का बसतो.

काही कुटुंबातून स्त्रिया स्वातंत्र्य उपभोगताना आढळून येतात पण ते डाळ–भातापुरतेच मर्यादित. आत्मसंपन्नतेसाठी व आत्मोन्नतीसाठी स्त्रियांचे होत असलेले प्रयत्न फारच संकुचित स्वरूपाचे आढळून येतात. त्यांना निर्णयाचे स्वातंत्र्य मिळत नाही. संसार करत असतानाही पतीच्या अरेरावीला सतत तोंड देणे, सांसारिक लहानसहान घटनांमध्ये पूर्णपणे बुडून जाणे, पतीची एक छाया म्हणून जीवन जगण्यात कृतार्थता वाटणे व स्वतःच्या अस्मितेचा, व्यक्तिमत्वाचा अभाव असणे ही सारी लक्षणे स्त्रीस्वातंत्र्याचा अभावच दर्शवितात.

सर्वसामान्यपणे स्त्रिया स्वतःचे मूल्यांकन पुरुषी दृष्टिकोनातून करताना आढळतात व विनाकारण स्वतःकडे नको तो कमीपणा घेतात. स्त्रिया बहुतांशी पती–मुले–कुटुंब या परिघातच रमलेल्या आढळतात. क्षमता असूनही स्वतःची क्षेत्रे विस्तृत करण्याचा प्रयत्न आढळत नाही. हे सर्व पहात असताना मनात प्रश्न उभा राहतो की शिक्षणामुळे स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत फरक पडला आहे का? स्वतंत्र विचार व स्वतंत्र व्यक्तिमत्व यांची जोपासना स्त्रिया करत आहेत का? या दृष्टीने खेडूत स्त्री किंवा कामकरी स्त्री स्वातंत्र्याचा भले विचार करताना आढळूत येत नसेल पण ती स्त्री सुशिक्षित स्त्रीपेक्षा निश्चित स्वातंत्र्य उपभोगताना आढळते. (स्वकमाईवर जगणे, पाट लावणे.) तरीसुद्धा स्वतंत्र भारताने स्त्रीशिक्षणात निश्चितच प्रगती केली आहे असे म्हणता येईल. स्त्रियांचा एक छोटा गट सद्यस्थितीत स्वतंत्र, विकसित, आत्मनिर्भर व संपन्न असा झालेला दिसतो. त्याचे प्रमुख कारण आर्थिक स्वावलंबन हे निश्चित आहे. स्वतःच्या तथाकथित मर्यादा झुगारून देऊन यातील बहुसंख्य स्त्रियांची आर्थिक कमाईची धडपड असते. त्याचबरोबर घरसंसार व तिने कमाविलेले सामाजिक स्थान यामध्ये कराव्या लागणाऱ्या धडपडीत ती पार थकून जाते

पुरुषप्रधान समाजरचनेत स्त्रीच्या प्रगतीला अस्मितेला, कर्तृत्वाला, स्वातंत्र्याला मान्यता मिळणे हा भाग महत्वाचा आहे. येथे पुन्हा हा हक्क पुरूषाच्या स्वाधीन आहे. अनेक युगांच्या समाजरचनेतील स्त्रीचे स्थान बदलताना उंचावत असताना दिसत आहे अर्थातच हे सामाजिक परिवर्तन आहे. समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तन म्हणजे रचनेतील बदल अशीच व्याख्या केली आहे. समाज ही एक व्यवस्था आहे, रचना आहे. या रचनेतील भिन्न भिन्न घटक परस्परावलंबी असतात. अशा या परिस्थितीत स्त्रीचे स्थान ती स्वतःहून बदलण्याचा प्रयत्न करीत आहे. व याचा परिणाम समाजावर होताना आढळतो. पण प्रमुख आघात पुरुष वर्गावर होत आहे. त्यामळे स्त्री-पुरूष यांमधील वैचारिक, सामाजिक व भावनिक देवाणघेवाणीत अनेक अडचणी येत आहेत. पूर्वी ह्या घटकाच्या अस्तित्वालाच मान्यता नव्हती त्यामुळे तिच्याकडून कोणत्याही प्रकारचा अडथळा येणे शक्य नव्हते. आज मात्र स्त्री काही प्रमाणात जागृत झाली आहे व पुरुष वर्गाच्या निर्णयावर बरे–वाईट मत प्रदर्शित करण्याची क्षमता निश्चितच तिने मिळविली आहे. आणि हाच भाग पुरुषी अहंकाराला मान्य होत नाही. आज जरी हे चित्र दिसत असले तरी कालांतराने निसर्गनियमानुसार हळूहळू हेही परिवर्तन दोन्ही घटकांकडून मान्यता पावेल अशी मात्र आशा वाटते व नंतर एका नवीन अशा स्त्री-पुरूष संबंधाची समाजरचना पहावयास सापडेल की ज्या समाज रचनेत स्त्री-पुरुष समान आहेत.

स्त्रिया आर्थिक कमाई करू लागल्या म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटेल असे प्रथम वाटत होते, पण पश्चिमी देशांतील वैभव–संपन्न स्त्रियांनासुद्धा स्त्री–मुक्तीसाठी लढा द्यावा लागत आहे. भारतीय स्त्रीबाबत विचार करत असताना असे दिसते की ती आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करत आहे. सर्वसामान्य कर्मचारी वर्गापासून तो उच्चाधिकारापर्यंत

सर्व ठिकाणी स्त्री आर्थिक उत्पादनाबरोबर जबाबदारीच्या जागा पेलताना आढळते. अशा स्त्रीमध्ये व तिच्या पतीमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास कमीपणा घेणे समजुनदारपणा दाखविणे इत्यादी तडजोड पूर्णपणे स्त्रीलाच करावी लागते. विवाह-बंधनाला, कुटुंबाला जपण्याची जबाबदारी केवळ स्त्रीचीच आहे अशा थाटाचे पुरूषाचे वर्तन आढळते. आणि अशी स्त्री सुद्धा केवळ आजन्म सुरक्षा व संरक्षण यासाठी पतीचे मिंधेपण पत्करताना दिसून येते. अशा स्त्रीने तरी स्वतःच्या अस्मितेला जपणे अपेक्षित आहे, पण ते दिसून येत नाही. म्हणूनच आजच्याही समाजात जेथे शक्य असेल तेथे स्त्रीवर शारीरिक अत्याचार होत आहेत. जेथे हे शक्य नसते तेथे मानसिक ताण आणि तणावाला स्त्रीचा बळी पडतो.

अर्थात अशासारखे सर्व प्रकार केवळ पुरुष वर्गाकडून घडतात असे नव्हे तर स्त्रीकडूनही स्त्रीचे शोषण फार मोठ्या प्रमाणात घडते. सासू-सुनेचे संबंध फार मागासलेले वाटत असतील तर आधुनिक काळातील कामाच्या ठिकाणी वरिष्ठ-कनिष्ठ असा जेथे संबंध येतो तेथे स्त्री वरिष्ठ अधिकारी असण्यापेक्षा पुरुष वरिष्ठ अधिकारी बरा असे अनेक सामान्य स्त्रियांचे प्रामाणिक मत असते.

हुंड्याची विवाहामध्ये असलेली अट म्हणजे समाज स्त्रीची करत असलेली विटंबनाच होय. देशात दररोज बावीस तरुण मुली हुंड्यामुळे जीवनाला मुकतात. अशा या गैर व अपमानास्पद रुढीविरुद्ध लढा देण्यासाठी काही महिला पुढे येत आहेत. सबंध भारतीय समाज ढवळून निघालेला नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की संघर्ष अजूनही पहिल्याच पातळीवर अडकून राहिला आहे, सर्वव्यापी झालेला नाही.

पाश्चिमात्य देशात अशा प्रकारची प्रखर आंदोलने झाली व होत आहेत. भारतातील स्त्रीला स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर ते जुन्या, गैरपरंपरा व रुढींपासून मिळविले पाहीजे. नाहीतर काही प्रथित यश डॉक्टर स्त्रिया अवघड ऑपरेशनसुद्धा यशस्वीरीत्या करतात पण स्वतःच्या मुलांच्या आरोग्य संपदेसाठी जिवतीचे व्रत आचरताना आढळतात. हा विरोधाभास कुठेतरी थांबविला पाहिजे. त्याची जागा डोळस बुद्धीवाद जेव्हा घेईल तेव्हाच स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाली असे म्हणता येईल.

पुरुषाला स्त्रीने जीवनसाथी म्हणून निवडण्यात काहीच गैर नाही. पण तो खऱ्या अर्थाने साथीच रहावा. स्त्रीने आपल्या जीवननौकेचे सुकाणू त्याच्या हाती सोपवू नये. स्वतःची निर्णयक्षमता, बुद्धी व आवड निवड पहिल्यापासून जपली पाहिजे; जेणेकरून स्त्रीचे स्वतःचे अस्तित्व, मग ते चार भिंतींतील का असेना सर्वार्थाने तिचेच असेल. ती स्त्री केवळ पतीची छाया बनून रहाता उपयोगी नाही. अशा स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या स्त्रीलाच स्वतंत्र स्त्री म्हणून संबोधता येईल. केवळ पुरुषी अनुकरण म्हणजेही स्त्रीस्वातंत्र्य नव्हे. वेषभूषा व केशभूषेत पुरुषी अनुकरण करणे व स्त्री म्हणून स्वतःची असलेली वैशिष्टचे नाहीशी करणे म्हणजे स्त्रीमुक्ती अशा मूर्ख कल्पना स्त्रीने कधीही करून घेऊ नये. त्याचप्रमाणे स्त्री म्हणून काही वैशिष्टचे जपताना मनात सतत कमीपणाची भावनाही बाळगून उपयोगाची नाही. निसर्गनियमानुसार स्त्री काही काळ तरी पुरुषाशी शारीरिक कष्टात बरोबरी करू शकत नाही. समाजाचे सातत्य टिकविण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य तिच्या विशिष्ट शारीरिक घडणीमुळेच पार पाडले जाते. असे असताना स्त्री-कर्मचाऱ्यांत गैरहजेरीचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक असते म्हणून कामास ठेवताना पुरुषानंतर तिचा नंबर लावला जातो. बरेच वेळा हे कारण पुढे करून तिची निवड नाकारली जाते. रजा अधिक होतात ही गोष्ट सत्य आहे, पण पुनरुत्पादनाची गरज सबंध समाजातच आहे. तेव्हा त्यामुळे नोकरीत सोसाव्या लागणाऱ्या तोटयाला स्त्रीच जबाबदार धरून चालणार नाही.

समाजातील दुष्ट रूढीपासून व पुरुषी वर्चस्वापासून कदाचित स्वतंत्रता मिळेलही. पण म्हणून स्त्री मुक्त होणार नाही. खऱ्या अर्थाने स्त्रीस्वातंत्र्याची कल्पना आत्मविश्वासात व आत्मनिर्भरतेत सामावलेली आहे. स्वातंत्र्यामुळे मिळणारे सुख आत्मसात करणे व प्राप्त सामाजिक परिस्थितीत यशस्वीपणे समाधानाने जीवन जगणे यातच स्त्री स्वातंत्र्य सामावले गेले आहे.

– प्रा. मंगला जोशी